

एम्को फाउंडेशनतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली. पात्र विद्यार्थ्यांसोबत 'लोकमत'चे संपादक सुधीर महाजन, एस. रामास्वामी, अक्षयकुमार माथूर आदी.

## एम्को फाउंडेशनतर्फे

# गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप

**जळगाव** | दि. २१

**एम्को** फाउंडेशनतर्फे आज गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम औद्योगिक वसाहतीतील एम्को कंपनीत करण्यात आला. 'लोकमत'चे संपादक सुधीर महाजन, एम्को फाउंडेशनचे अध्यक्ष एस. रामास्वामी, व्हाईस प्रेसिडेंट अक्षयकुमार माथूर, ओमान येथील कंपनीचे ग्राहक ॲलन लॉकहुड व अंजनीकुमार सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्ष लागवड व गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली.

एम्को फाउंडेशन पाचव्या वर्षात वाटचाल करीत असून सामाजिक क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती रामास्वामी यांनी दिली. तर संघर्षासोबत आपले ध्येय गाठण्यासाठी शंभर टक्के प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सुधीर महाजन यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. वडील वॉचमन असतांनादेखील जीवनातील संघर्षाला तोंड देत एम्को फाउंडेशनच्या मदतीने सी.ए. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झालेल्या प्रीती सिंगच्या अनुभव कथनाने सर्वांना भारावून टाकले.

शिक्षण, पर्यावरण आणि आरोग्य या तीन प्रमुख सामाजिक उपक्रमासाठी डिसेंबर २००७ पासून एम्को फाउंडेशन कार्यरत आहे. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वस्तीत जाऊन शिक्षणासह व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्य अशा विविध विषयांवर फाउंडेशन कार्य करीत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप जोशी तर आभार सीमा खरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी कंपनीच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.